Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Nea
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.नं.८३२—ए, फायनल प्लॉट नं.
१७८,१७९, बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे—४११ ००४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 Fax : 25665807 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./लेखा—प्रकाशन/२२२८
पुणे ४११ ००४.
दिनांक— १९/०६/२०२५

आ.क्र. 6152
दि. 14/07/2025

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय**— शैक्षणिक वर्ष २०२५—२६ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.

संदर्भ — क्र.रा.मं./लेखा—प्रकाशन/१९३७/दि.०२/०६/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, राज्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२५—२६ चे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क www.mahahsscboard.in या राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सोमवार दि.२३/०६/२०२५ पासून स्विकारण्यात येणार आहे.

संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून मार्च—२०२५ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारीत करण्यात आलेले आहे. दि. १० ऑगस्ट २०२५ नंतर प्रचलित पध्दतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाची वर्गणी ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाची आहे. तसेच सदर संकेतस्थळावरून तयार होणारी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम पेमेंट गेटवेद्वारे भरणा करण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. कोणत्याही परिस्थितीत विभागीय मंडळ स्तरावर नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची रक्कम रोखीने स्विकारण्यात येवू नये.

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क नवीन संगणक प्रणालीद्वारे मंडळाकडे भरणा केल्याशिवाय फेब्रु./मार्च—२०२६ मध्ये घेण्यात येणा—या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळास सादर करता येणार नाहीत, याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यात यावे.

उपरोक्त नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रणालीबाबत आपल्या अधिनस्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात यावे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास सादर करावा.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ४.

क्र/पुविमं/लेखा/-2/
पुणे-411005
दि- 11/07/2025

प्रति, प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्य. शाळा/क.महाविद्यालय
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर.

विषय - शैक्षणीक वर्ष 2025-26 साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत
संदर्भ - क्र.रा.मं/लेखा - प्रकाशन /2228, दि.19/06/2025

उपरोक्तप्रमाणे नोंद घेवुन सर्व संबंधितांना याबाबत सुचीत करण्यात यावे.

14.7.25
कैलास दळवी
विभागिय सचिव
पुणे विभागीय मंडळ